09 JAN 2026

पुढारी

# विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षेला २ हजार ८१२ विद्यार्थी उपस्थित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील परीक्षेला २ हजार ८१२ विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. गुरुवारी एमबीए., एम.कॉम., एमबीए (डिस्टन्स) अशा ९ अभ्यासक्रमांच्या परीक्षा २३ केंद्रांवर झाल्या. दि.८ रोजी एम.कॉम., विविध सत्राच्या अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले. आजअखेर ४४४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत.

परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

0 9 JAN 2026

तरूण भारत

# वरिष्ठ शास्त्रज्ञाचा सोमवारी शिवाजी विद्यापीठात संवाद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात भौतिकशास्त्र अधिविभाग आणि अणुऊर्जा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने भारत सरकारच्या अणुऊर्जा विभाग (डीएई) मधील करिअरच्या संधी आणि भाभा अणुसंशोधन केंद्रद्वारे (बीएआरसी) होणाऱ्या भरती प्रक्रियेबद्दल मार्गदर्शन करण्यासाठी 'डीएई आउटरीच प्रोग्राम–२०२६'चे आयोजन केले आहे. सोमवार दि. १२ रोजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात दुपारी ३ वाजता हा कार्यक्रम होणार आहे. यामध्ये बीएआरसीचे वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि अभियंते उपस्थित राहून विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. विशेषतः विज्ञान आणि अभियांत्रिकी शाखेच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. देशातील अणुऊर्जा क्षेत्रातील विविध राष्ट्रनिर्माण उपक्रमांना गती देण्यासाठी, भाभा अणुसंशोधन केंद्र (बीएआरसी) प्रशिक्षण शाळेमार्फत दरवर्षी अणुऊर्जा विभाग (डीएई) वैज्ञानिक अधिकाऱ्यांची भरती करत असते.

0 3 JAN 2020
लोकमत



कोल्हापुरात गुरुवारी झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय क्रिकेट स्पर्धेत कॉमर्स कॉलेजने सलग दुसऱ्या वर्षी अजिंक्यपद पटकाविले. मान्यवरांच्या हस्ते चषक स्वीकारताना विजेता संघ.

# कॉमर्स कॉलेजला सलग दुसऱ्या वर्षी अजिंक्यपद

## शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय क्रिकेट स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय क्रिकेट पुरुष स्पर्धेत महावीर कॉलेज संघावर मात करून कॉमर्स कॉलेजच्या संघाने विजेतेपद पटकाविले. शिवाजी विद्यापीठ क्रिकेट मैदानावर सामना पार पडला.

कागल येथील डी. आर. माने महाविद्यालयात आयोजित या स्पर्धा झाल्या. प्रा. विजय रोकडे यांच्या हस्ते नाणेफेक करून सामन्यांची सुरुवात करण्यात आली. प्रथम फलंदाजी करताना कॉमर्सने २० षटकांत ५ बाद संघाला २० षटकांत १४४ धावा करता आल्या. कॉमर्स संघाने ५८ धावांनी हा सामना जिंकला. तृतीय क्रमांक सांगली येथील वालचंद कॉलेज ऑफ इंजीनियरिंग, आणि ईश्वरपूर येथील आर. आय. टी. इंजिनिअरिंग कॉलेजने चतुर्थ क्रमांक पटकाविला.

प्रा. बिपिन माने, प्राचार्य डॉ. नंदकुमार कदम यांच्या उपस्थितीत बक्षीस वितरण झाले. विजेत्या संघाला शिवाजी विद्यापीठाकडून दिल्या जाणाऱ्या मानाचा 'लिंग्रज चषक' देऊन सन्मानित केले. स्पर्धेचे संयोजन डॉ. श्रीनिवास पाटील, प्रा. संग्राम तोडकर यांनी केले. यावेळी शिवाजी विद्यापीठ स्पर्धा निरीक्षक प्रा. हर्षकुमार पाचोरे, प्रा. विनायक खोत, प्रा. विजय कांबळे,

09 JAN 2026
सकाळ

अवतीभवती

# अणुऊर्जा विभागातील शास्त्रज्ञ सोमवारी साधणार संवाद

**कोल्हापूर :** केंद्र सरकारच्या अणुऊर्जा विभागामधील करिअरच्या संधी आणि भाभा अणुसंशोधन केंद्र (बीएआरसी) द्वारे होणाऱ्या भरती प्रक्रियेबद्दल भौतिकशास्त्र आणि अणुऊर्जा विभागातर्फे सोमवारी (ता. १२) दुपारी तीन वाजता मार्गदर्शन होणार आहे. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहातील या कार्यक्रमात बीएआरसीचे वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि अभियंते उपस्थित राहून विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाद्वारे अभियांत्रिकी आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना, विशेषतः अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना, डीएईमधील संशोधन विकासाच्या आघाडीच्या क्षेत्रांविषयी माहिती दिली जाणार आहे. डीएईच्या अंतर्गत येणाऱ्या इंदिरा गांधी सेंटर फॉर अ‍ॅटॉमिक रिसर्च, राजा रामण्णा सेंटर फॉर अ‍ॅडव्हान्स्ड टेक्नॉलॉजी, व्हेरिएबल एनर्जी सायक्लोट्रॉन सेंटर, अ‍ॅटॉमिक मिनरल्स डायरेक्टरेट, जागतिक अणुऊर्जा भागीदारी केंद्र, डीएईच्या इतर संस्थांमध्ये करिअर कसे करावे याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर पूर्वनोंदणी करावी, असे आवाहन संयोजकानी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 JAN 2026
जनप्रवास

# डिजिटल युगात गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी ई-कन्टेन्ट अपरिहार्य

**जनप्रवास : कोल्हापूर**

डिजिटल युगात गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी ई-कन्टेन्ट अपरिहार्य आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाच्या संगणक विभागाचे संचालक अभिजित रेडेकर यांनी केले.

**● संगणक विभागाचे संचालक अभिजित रेडेकर यांचे मत**

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि अंतर्गत गुणवत्ता हमी सेल यांच्या संयुक्त विद्यमाने पी.एम.-उषा अंतर्गत डिझाईन अँड डेव्हलपमेंट ऑफ ई-कन्टेन्ट फॉर ऑनलाईन अँड मुक्स या विषयावर आयोजित कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी बहुविद्याशाखीय विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. अजय साळी होते.

रेडेकर म्हणाले, ई-कन्टेन्ट विकासाचे कौशल्य प्रत्येक शिक्षक व विद्यार्थ्यांने आत्मसात करणे अत्यावश्यक आहे. आजच्या काळात तंत्रज्ञान साक्षरता ही मूलभूत गरज बनली असून, स्वयं व महा-स्वयं या प्लॅटफॉर्मवर सक्रिय सहभाग घेणे महत्त्वाचे आहे. डिजिटल शिक्षणामुळे शिक्षणाच्या संकल्पनांमध्ये मोठा बदल घडून येत असून, या बदलत्या परिस्थितीत विद्यार्थी-केंद्रित ई-कन्टेन्ट निर्मिती ही काळाची गरज बनली आहे. प्रास्ताविक डॉ. नितीन रणदिवे यांनी केले. पाहुण्यांची ओळख नाझिया मुल्लाणी, सूत्रसंचालन डॉ. नगिना माळी, तर आभार प्रदर्शन संदीप थिटे यांनी केले. यावेळी उपकुलसचिव विनय शिंदे, डॉ. नितीन माळी, डॉ. चांगदेव बंडगर, डॉ. सूर्यकांत गायकवाड, डॉ. राम चट्टे, प्रा. कांचन खराडे, डॉ. प्रमोद कोळी, डॉ. किशोर खिल्लारे, डॉ. करीम मुल्ला, डॉ. रोहिणी भोसले उपस्थित होते.

तरुण भारत

# उपेक्षित, वंचितांचा इतिहास समोर यावा

प्रतिनिधी
कोल्हापूर

▪ प्रा. ज्ञानेंद्र पांडेय : शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा अधिविभागाच्यावतीने व्याख्यान

वंचित, उपेक्षितांच्या जगण्याचा आणि अनुभवाचा इतिहास लिहीणे अत्यंत कठीण असते, पण तोच खरा दुर्लक्षित इतिहास आहे. तो सामोरा आणण्याचे काम नव्या पिढीतील इतिहास अभ्यासक, संशोधकांना करावे, असे प्रतिपादन अटलांटा (अमेरिका) येथील एमोरी विद्यापीठाचे प्रख्यात इतिहासतज्ज्ञ प्रा. ज्ञानेंद्र पांडेय यांनी केले.



शिवाजी विद्यापीठात इतिहास, इंग्रजी, मराठी, हिंदी व विदेशी भाषा अधिविभागाच्यावतीने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. 'दुर्लक्षित इतिहास: लपलेल्या इतिहासाची पुनर्प्राप्ती" विषयावर त्यांनी मागदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर होते. डॉ. माया पंडित प्रमुख उपस्थित होती.

प्रा. पांडेय म्हणाले, समाज, राजकारण, संस्कृती आणि विचारप्रवाह यांमध्ये होणारे बदल हे क्रांतीचेच स्वरूप असून आजच्या काळातील डिजिटल क्रांतीने इतिहास लेखन व संशोधनाच्या पद्धतींमध्ये आमुलाग्र बदल घडवला आहे. इतिहासामध्ये नेत्यांचाच नव्हे, तर सर्वसामान्य जनता, उपेक्षित वर्ग, स्त्रिया यांचाही सहभाग असतो.

इतिहास लेखनात या घटकांचे योगदान अनेकदा दुर्लक्षित राहिल्याने इतिहासाचा समग्र आशय समोर येत नाही. भविष्यातील इतिहास मात्र केवळ मोठ्या लढायांचा किंवा नेत्यांचा नसावा. तो इतिहास अशा सर्वसामान्य, वंचित, उपेक्षित योगदान कर्त्यांचा असावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

डॉ. अवनीश पाटील यांनी स्वागत केले. डॉ. प्रभंजन माने यांनी आभार मानले. यावेळी डॉ. गोपाळ गुरू, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. अक्षय सरवदे, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. शरद नावरे, डॉ. शरद भुथाडिया आदी उपस्थित होते.

0 9 JAN 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी ई-कंटेंट अपरिहार्य

## अभिजित रेडेकर; शिवाजी विद्यापीठामध्ये कार्यशाळा

**कोल्हापूर :** ई-कंटेंट विकासाचे कौशल्य शिक्षक व विद्यार्थ्यांनी आत्मसात करणे आवश्यक आहे. डिजिटल युगात गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी ई-कंटेंट अपरिहार्य आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या संगणक विभागाचे संचालक अभिजित रेडेकर यांनी केले.

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र व अंतर्गत गुणवत्ता हमी सेल यांच्या संयुक्त विद्यमाने पी. एम.-उषा अंतर्गत 'डिझाईन अँड डेव्हलपमेंट ऑफ ई-कंटेंट फॉर ऑनलाईन अँड मूक्स' याविषयी झालेल्या दोन दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी बहुविद्याशाखीय विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. अजय साळी होते. अभिजित रेडेकर म्हणाले, तंत्रज्ञान साक्षरता ही मूलभूत गरज बनली असून, स्वयं व महास्वयं या प्लॅटफॉर्मवर सक्रिय सहभाग घेणे महत्त्वाचे आहे. पहिल्या सत्रात अहिल्यानगर येथील नॉलेज ब्रीज फाऊंडेशनचे प्रशिक्षक भूषण कुलकर्णी म्हणाले, विद्यार्थ्यांनी डिजिटल साधने समजून घेणे व ती कुशलतेने हाताळणे ही शैक्षणिक गरज आहे. प्रास्ताविक डॉ. नितीन रणदिवे यांनी केले. पाहुण्यांची ओळख नाझिया मुल्लाणी यांनी करून दिली. सूत्रसंचालन डॉ. नगिना माळी यांनी केले. आभार संदीप थिटे यांनी मानले. उपकुलसचिव विनय शिंदे, डॉ. नितीन माळी, डॉ. चांगदेव बंडगर, डॉ. सूर्यकांत गायकवाड, डॉ. राम चट्टे, प्रा. कांचन खराडे, डॉ. प्रमोद कोळी, डॉ. किशोर खिल्लारे, डॉ. करीम मुल्ला, डॉ. रोहिणी भोसले आदी उपस्थित होते.

तरुण भारत



कोल्हापूर : देणगीचा धनादेश कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्याकडे सुपूर्द करताना डॉ. स्नेहल जोशी. सोबत प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि डॉ. राजाराम गुरव.

# गजेंद्र प्रतिष्ठानतर्फे शिवाजी विद्यापीठास देणगी

कोल्हापूर : गजेंद्र प्रतिष्ठानकडून प्रसिद्ध उद्योजक कै. अरविंद गजानन देशपांडे यांच्या स्मरणार्थ शिवाजी विद्यापीठास एक लाख रुपयांची देणगी देण्यात आली. पुणे येथील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटमधील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. स्नेहल श्रीकांत जोशी यांनी प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या उपस्थितीत कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्याकडे देणगीचा धनादेश सुपूर्द केला. डॉ. जोशी या शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या माजी विद्यार्थिनी आहेत. या देणगीच्या रकमेवर मिळणाऱ्या व्याजातून वनस्पतीशास्त्र अधिविभागातील पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रसिद्ध केलेल्या उत्कृष्ट संशोधन लेखास 'बेस्ट रिसर्च पेपर" पारितोषिक देण्यात यावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, अधिविभागाचे प्रमुख डॉ. निखिल गायकवाड आदी उपस्थित

पुण्यनगरी



# गजेंद्र प्रतिष्ठानकडून विद्यापीठास देणगी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

गजेंद्र प्रतिष्ठानकडून उद्योजक अरविंद गजानन तथा आबा देशपांडे यांच्या स्मरणार्थ एक लाख रुपयांची देणगी शिवाजी विद्यापीठास देण्यात आली. देशपांडे यांच्या भगिनी तथा मांजरी (पुणे) येथील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटमधील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. स्नेहल जोशी (पूर्वाश्रमीच्या रेखा देशपांडे) यांनी हा धनादेश प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या उपस्थितीत कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्याकडे सुपूर्द केला.

डॉ. जोशी या विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या माजी विद्यार्थिनी आहेत. आबा देशपांडे यांच्या पर्यावरण प्रेमास अनुसरून त्यांनी त्यांच्या स्मरणार्थ देणगी दिली. या रकमेवर मिळणाऱ्या व्याजातून वनस्पतीशास्त्र अधिविभागातील पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी प्रसिद्ध केलेल्या उत्कृष्ट संशोधन लेखास 'बेस्ट रिसर्च पेपर' पारितोषिक द्यावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, अधिविभागाचे प्रमुख डॉ. निखिल गायकवाड आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 9 JAN 2026

सकाळ

# महर्षी शिंदेंची दृष्टी रचनात्मक

## डॉ. सुशील धसकटे; प्रा. गो. मा. पवार लिखित पुस्तकाचे प्रकाशन

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ८ : 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी सामाजिक परिवर्तनाची मांडणी केवळ संघर्षापुरती मर्यादित न ठेवता रचनात्मक दृष्टी आणि रचनात्मक कार्य उभारणीतून केली. शिक्षण, सामाजिक समता आणि बहिष्कृत समाजाच्या उन्नतीसाठी त्यांनी केलेले कार्य प्रेरणादायी आहे', असे प्रतिपादन लेखक डॉ. सुशील धसकटे (पुणे) यांनी केले.**

शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे शिंदे यांच्या स्मृती दिनानिमित्त विशेष व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, डॉ. प्रकाश पवार प्रमुख उपस्थित होते. प्रा. गो.मा. पवार लिखित-संपादित 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या कार्याचे पैलू' या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले.

डॉ. धसकटे म्हणाले, 'विविध प्रकारच्या नोंदी वेळोवेळी ठेवण्याच्या महर्षी शिंदे यांच्या स्वभावामुळे आजघडीला भारताच्या सामाजिक इतिहासाचा मोठा दस्तावेज निर्माण झाला आहे. त्यांचा हाच वारसा प्रा. पवार यांनीही पुढे जोपासला आहे.'

डॉ. पवार म्हणाले, 'शिंदे यांनी 'बहिष्कृत भारत' ही संकल्पना मांडून भारताचा दुर्लक्षित आणि वंचित चेहरा जगासमोर आणला. भारतीय आधुनिकतेच्या ऱ्हासपर्वाच्या काळात लिहिण्याचे धाडस पवार यांनी केले आहे.'

डॉ. शिंदे म्हणाले, 'अस्पृश्यता निवारण, मुरळी प्रथा प्रतिबंध तसेच शेतकरी मेळावे इत्यादींच्या माध्यमातून समाजातील वंचित घटकांसाठी महर्षी शिंदे यांनी तळमळीने काम केले.'

या कार्यक्रमात राष्ट्रपती पदक विजेता विद्यार्थी अक्षय जहागीरदार, गुणवंत विद्यार्थिनी अनुराधा गुरव यांचा डॉ. साळुंखे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रारंभी ज्येष्ठ पर्यावरणवादी माधव गाडगीळ आणि हिंदी साहित्यिक ज्ञानरंजन यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी परिचय करून दिला.

यावेळी राहुल पवार, प्रभंजन माने, संदीप भुयेकर, भारतभूषण माळी, दीपक भादले, युवराज देवाळे, दत्ता जाधव उपस्थित होते. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

### महर्षी शिंदे यांचे विचार अधिक उपयुक्त

■ **डॉ. साळुंखे म्हणाले, 'महर्षी शिंदे यांचे कार्य समजून घेताना संघर्ष, रचनात्मक कार्य यांचा समतोल महत्त्वाचा आहे. समाजातील विषमता, अस्वस्थता, बहिष्कार समजून घेण्यासाठी त्यांचे विचार अधिक उपयुक्त ठरतात.'**



शिवाजी विद्यापीठ : 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या कार्याचे पैलू' या पुस्तकाचे प्रकाशन करताना माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे. शेजारी डावीकडून डॉ. रणधीर शिंदे, राहुल पवार, प्रकाश पवार, व्ही. एन. शिंदे, सुशील धसकटे, नंदकुमार मोरे उपस्थित होते.